कोर्ट विदयमान श्री.विद्यासागर चव्हाण ,तहसिलदार ब्रम्हपूरी ,यांचे न्यायालय.

रामाप्रं.2-/RTS-64/2015-16

मौजा-देलनवाडी

आदेश

(पारीत दिनांक 31-8-2016)

ज्याअर्थी अर्जदार श्री. देवराव बक्षीजी पिलारे व श्री. अनुज वसंतराव मेंढूले दोन्ही रा. ब्रम्हपूरी यांनी मौजा देलनवाडी येथील गट क्रमांक 101 व 280 अनुक्रमे आराजी 0.87 व 0.08 एकूण आराजी 0.95 हे.आर जमीनीचे अकृषक रुपांतर होऊन कजाप पत्रकाप्रमाणे 7/12 अभिलेख एकाच प्लाटचे वेगवेगळे परंतू एकाच क्रमांकाचे तयार करण्यात आले मंजूर अभिन्यासातील प्लाट क्रमांक 2 व 3 हे स्वतंत्ररित्या दर्शविण्यात आलेले आहे त्याप्रमाणे तलाठी अभिलेख दुरुस्त करण्यास विनंती अर्ज सादर केलेला आहे. अर्जासोबत अकृषक आदेश,7/12 , विक्रीपत्राची प्रत ,क.ज .प. जोडली आहे त्यावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले.

प्रकरणामध्ये तलाठी ब्रम्हपूरी यांना मौजा देलनवाडी येथील गट क्रमांक 101 व 280 अनुक्रमे आराजी 0.87 व 0.08 एकूण आराजी 0.95 हे.आर जमीनीचे अकृषक रुपांतर केलेले कजाप पत्रकाप्रमाणे 7/12 अभिलेख तपासून सविस्तर अहवाल मागविण्यात आला.,त्यानुसार खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झालेला आहे.

तलाठी ब्रम्हपूरी यांचे अहवालानुसार सदर अभिलेख तयार करताना कमी जास्त पत्रकाप्रमाणे अभिलेख तयार करण्यात आले असून प्लाट क्रमांक 2 व 3 चे 7/12 तयार करताना गट क्रमांक 101/2,280/2,व 101/3,अशा प्रकारे एकाच प्लाटचे वेगवेगळे परंतू एकाच क्रमांकाचे अभिलेख तयार करण्यात आलेले आहे.अकृषक आदेशाप्रमाणे एकच प्लाट असतांना वेगवेगळे अभिलेख तयार झाल्यामुळे ते गट क्रमांक एकत्रीत करण्यास गरजेचे आहे त्यामुळे दोन्ही प्लाट बाबत एकत्रीकरण करण्यास आदेश व्हावेत असे अहवालात नमूद केलेले आहे.

उपअधिक्षक भूमी अभिलेख ब्रम्हपूरी यांचे दिनांक 23/06/2016 चे पत्रानूसार कमी जास्त पत्रक प्राप्त झ ाले त्यानुसार खालील प्रमाणे भू.क्रमांक मध्ये दर्शविलेले क्षेत्राची विभागणी केली.

क्षेत्रफळाचा तपशील

प्लाट क्रमांक	भुमापन क्रमांक	क्षेत्र चौ.मीटर	भू.क्र.101च्या ताबा वहीवाटी पैकी क्षेत्र चौ.मी.	भू.क्र.280च्या ताबा वहीवाटी पैकी क्षेत्र चौ.मी.
1	101	569.33	569.33	
2	101,280	870.22	687.09	183.13
3	101,280	637.28	290.41	346.87
4	101	495.51	495.51	
5	101	450.00	450.00	
6	101	472.32	472.32	
7	101	564.51	564.51	
8	101	450.00	450.00	
9	101	518.76	518.76	
10	101	635.74	635.74	
अतिक्रमण क्षेत्र	101,280	344.44	74.44	270.00
खुली जागा	101	959.84	959.84	
रस्त्याचे क्षेत्र	101	2532.05	2532.05	
एकूण क्षेत्र (चौ.मी.)		9500.00	8700.00	800.00

सदर प्रकरणात प्राप्त कागदपत्रांची सखोल पडताळणी केली असता खालीलप्रमाणे स्पष्ट निष्कर्ष निघतात.

1. मौजा देलनवाडी येथील स.न.101,आराजी 0.87 हे.आर व स.नं.280,आराजी 0.08 हे.आर (एकूण आराजी 0.95 हे.आर) जमीन मुख्याधिकारी नगर परीषद ब्रम्हपूरी यांचे क्रं 6/ नपब्र/नियोजन/अकृषक/2016/289/ आदेश दिनांक 9/06/2016 अन्वये निवासी प्रयोजना करीता अकृषक करण्यात आलेली आहे.
2. सदर,मंजूर अभिन्यास मधील एकूण 10 भूखंड अर्जदार श्री. देवराव बक्षीजी पिलारे व श्री अनुज वसंतराव मेंढूले रा. ब्रम्हपूरी याना या कार्यालयाचे रामाक्रं.4/एनएपी-34/2015-16 दिनांक 01/07/2016 अन्वये अकृषक वापरास मंजूरी प्रदान केलेली आहे.
3. उपअधिक्षक,भूमी अभिलेख,ब्रम्हपूरी यांचेकडील मोजणी मामला क्रमांक 66/16 ,दिनांक 23/06/2016 मधील नकाशाप्रमाणे एकूण 10 भूखंडाचे क्षेत्र दर्शविलेले असून कमी जास्त पत्रका प्रमाणे प्रचलित अभिलेखाप्रमाणे एकूण 0.95 हे.आर क्षेत्राची दुरुस्ती नमुद केलेली आहे.

आदेश

वरील सर्व बाबीची सखोल पडताळणी करुन मी तहसिलदार ब्रम्हपूरी,महाराष्ट्र जमीन महसूलअधिनियम,1966 चे कलम 150 आणि कलम, 155 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख सुस्थितीत ठेवणे व नोंदवहया (तयार करणे व ठेवणे) नियम 1971 अन्वये मौजा ब्रम्हपूरी येथील स.न. 101, आणि 280 मधील दहा अकृषक भुखंडापैकी भूखंड क्रमांक 2 व 3 करीता मोजणी मामला क्रमांक 66/2016 मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकत्रित आराजी करुन अभिलेख दुरुस्त करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

सदर आदेश आज दिनांक 31 ऑगस्ट 2016 रोजी माझे सही व शिकयानिशी निर्गमित करीत आहे.

तहसिलदार ब्रम्हपूरी.

प्रतिलिपी- तलाठी सा क्रं.12 ब्रम्हपूरी यांना वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

तहसिलदार ब्रम्हपूरी.

तहसिलदार ब्रम्हपुरी